RCS No. 66/2026
Exh. 5

रे.क.नं.          /२०२६

# कागल येथील मा. सि.ज.ज्यु.डि.
# यांचे कोर्टात...

| | | |
|---|---|---|
| **अब्दुल गुलाब शहाणेदिवाण**<br>व.व.५०,धंदा-शेती, रा.बाचणी,<br>ता.कागल, जि.कोल्हापूर | — | वादी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| **बाळू गणी शहाणेदिवाण**<br>व.व.५०, धंदा-शेती, रा.बाचणी,<br>ता.कागल, जि.कोल्हापूर | — | प्रतिवादी |

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.05.07 17:39:50 +0530

**सि.पी.सी.ऑर्डर ३९ व रुल १ व २**
**प्रमाणे तुर्तातूर्त मनाई अर्ज.**

..२/-

Asstt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

<u>यातील वादीचा विनंती अर्ज असा की,</u>

यातील वादींनीप्रतिवादींविरुध्द कायम मनाईचा,आज्ञार्थी मनाईचा व वाटणीसाठी दावा दाखल केलेला आहे.तरी यातील प्रतिवादी यांनी दावा मिळकतीं मधील समाईक कब्जेवहिवाटीतून वादी यास बेदखल करु नये अगर हुसकावून लावू नये म्हणून प्रतिवादीविरुध्द एकतर्फी तुर्तातूर्त मनाई करणेत यावी. यांसी कारणे पुढील प्रमाणे :-

१) <u>दावा मिळकतीचे वर्णन</u> :-

बाचणी, ता.कागल, जि.कोल्हापूर येथील खालील वर्णनाच्या घर मिळकती व खुल्या जागा.

अ) सि.स.नं.६५ याचे क्षेत्र ३१.५० चौ.मी. ची खुली जागा मिळकत.

ब) सि.स.नं.४८ याचे क्षेत्र २८.४० चौ.मी. ची घर मिळकत.

क) सि.स.नं.५३ याचे क्षेत्र ३०.०० चौ.मी. ची समाईक बोळाची मिळकत.

ड) सि.स.नं.४७ याचे क्षेत्र २.५ चौ.मी. ची समाईक पाण्याचे नळाची जागा.

२) दावा सि.स.नं.६५ या मिळकतीमध्ये वादी,प्रतिवादी व नबी बाळू शहाणेदिवाण यांचा प्रत्येकी १/३ हिस्सा होय. नबी बाळू शहाणेदिवाण यांचा सदर

..३/-

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

मिळकतीमध्ये १/३ हिस्सा त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारसांनी वादी यांना दि.२०/०१/२००६ इ.रोजीचे खरेदीपत्राने रक्कम रुपये ५०००/- चे मोबदल्यात खरेदी दिलेला आहे. त्यामुळे दावा सि.स.नं.६५ या मिळकतीमध्ये वादीचा २/३ हिस्सा व प्रतिवादीचा १/३ हिस्सा होय.

३) दावा सि.स.नं.४८ या मिळकतीमध्ये वादीचा १/२ हिस्सा असून प्रतिवादी यांचा १/२ हिस्सा होय. दावा सि.स.नं.५३ ही मिळकत समाईक बोळाची मिळकत असून दावा सि.स.नं.५३ हा समाईक बोळ वादी-प्रतिवादी हे वापरत असतात. यातील प्रतिवादी यांनी दावा सि.स.नं.५३ या समाईक येणे-जाणेच्या बोळामध्ये बेकायदेशीरपणे लोखंडी जिना बसविलेला आहे व गॅलरी काढलेली आहे. त्यामुळे सदर दावा सि.स.नं.५३ या समाईक बोळ जागेतून जाणे-येणेस अडथळा निर्माण झालेला आहे. दावा सि.स.नं. ४७ ही समाईक पाण्याच्या नळाची जागा होय.

४) अशी वस्तुस्थिती असताना व त्याप्रमाणे नोंदी सदर मिळकतींचे सिटी सर्व्हे मालमत्तापत्रक सदरी झालेल्या असताना अलिकडे प्रतिवादीने दांडगाव्याने दावा मिळकतीमधील वादींचे हक्क नाकारले चालू केले.



Asstt. ...
Civil Court Jr. Dn., Kagal

तसेच प्रतिवादीनी गावातील काही ग्रामपंचायत सदस्य व गावातील पुढारी यांना हाताशी धरुन दावा मिळकतीमध्ये वादीचा काहीही हक्कसंबंध नाही असा कांगावा सुरु केलेला आहे. वास्तविक दावा मिळकतींच्या सिटी सर्व्हेच्या प्रॉपर्टीकार्ड खातेस झालेल्या नोंदी कायम असून प्रतिवादीने आजतागायत सदर नोंदी कोठेही आव्हानीत केलेल्या नाहीत. त्यामुळे प्रतिवादीचे या बेकायदेशीर कृत्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांस दिनांक ०२/०४/२०२६ इ.रोजी आपले विधीज्ञांमार्फत रजि.पोष्टाने नोटीस पाठविली व वाटणी क़रुन देणेबाबतची मागणी केली. सदरची नोटीस प्रतिवादीस लागू होवून देखील प्रतिवादीने सदर नोटीसीस उत्तर दिलेले नाही अगर वादीनी नोटीसीमध्ये केलेली मागणी पूर्ण करुन दिलेली नाही. या कारणाने वादी यांना प्रतिवादीविरुध्द या मे.कोर्टामध्ये नाईलाजास्तव प्रस्तुतचा दावा या मे.कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे.

५) वादीना सकृतदर्शनी केस असून न्यायाचा तराजू वादी यांचे बाजूने आहे. जर मे.कोर्टाने वादीचा तुर्तातूर्त मनाईचा अर्ज मंजूर केला तर प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट मे.कोर्टानी वादी यांचा तुर्तातूर्त मनाईचा अर्ज नामंजूर केला तर वादी यांचे अतोनात नुकसान होणार आहे.



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

६) यातील प्रतिवादींनी वादी यांचविरुध्द या मे. कोर्टात कॅव्हेट अर्ज दाखल केलेला नाही अगर कॅव्हेट अर्जाची नोटीस रजि.पोस्टाने वादीना आलेली नाही.

७) **तरी वादींची विनंती की,**

अ) प्रतिवादी यांनी दावा मिळकतींमधील समाईक कब्जेवहिवाटीतून वादी यास बेदखल करु नये अगर हुसकावून लावू नये म्हणून प्रतिवादी यांचेविरुध्द दावेचे अंतिम निकालापर्यंत तुर्तातूर्त मनाई करणेत यावी.

ब) प्रस्तुतचा मनाईचा अर्ज खर्चासह मंजूर करणेत यावा.

क) जरुर तर दावा दुरुस्तीस परवानगी मिळावी.

ड) न्यायाचे सर्व हुकूम याच कामी व्हावेत.

........... येणेप्रमाणे तुर्तातूर्त मनाई अर्ज असे.

कागल

ता.२४/०४/२०२६.

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

## प्रतिज्ञा

मी वादी या लेखाद्वारे असे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील मनाई अर्जामधील सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कागल, ता.२४/०४/२०२६.

## ॲफिडेव्हीट

मी वादी श्री.अब्दुल गुलाब शहाणेदिवाण,व.व.५०,धंदा-शेती, रा.बाचणी, ता.कागल, जि.कोल्हापू देवाची शपथ घेवून सत्य प्रतिज्ञेवर असे ॲफिडेव्हीट करतो की, वरील मनाई अर्जामधील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मु।। कागल, ता.२४/०४/२०२६.

I Know the Deponent
K.A.K.
(Adv. K.A. Kumi)

## प्रतिज्ञा

मी वादी या लेखाद्वारे असे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील ॲफिडेव्हीटमधील सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे.म्हणून केली प्रतिज्ञा.आज मु।।कागल, ता.२४/०४/२०२६.

Solemnly Affirmed before me by
Shri. Abdul Gulab Shahnediwan
Age 50 of Bachni, Kagal who is
identified by Shri. K.A.Kulkarni Adv
.............whom I know personally
Dated :- 24/5/26

Assistant Superintendent